# लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे आर्थिक, सामाजिक, ऐतिहासिक व राजकीय घटक

(ब) आर्थिक घटक (ECONOMIC FACTORS)

भौगोलिक घटकाप्रमाणेच आर्थिक घटकांचाही लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम होत असतो. भौतिकदृष्ट्या विकसित देशात अर्थोत्पादन खूप प्रमाणात होऊन त्या भागाची लोकसंख्येची पोषण क्षमता वाढते. लोकसंख्येचे केंद्रीकरण वाढते. आर्थिक घटकात पुढील घटकांचा समावेश होतो.

१. वाहतूक (Transport):

ज्या प्रदेशात वाहतुकीच्या सोईचा विकास झालेला असतो, तेथे लोकसंख्येची घनता जास्त असते. वाहतुकीच्या सुविधांवर प्रदेशातील व्यापार व उद्योगधंदे अवलंबून असतात. वाहतूकीच्या दृष्टीने मार्मिक भौगोलिक स्थानांना गेल्या दीडशे वर्षांपासून फारच महत्त्व प्राप्त झालेले आहे. यामुळे लोकसंख्येची संबंधित क्षेत्रात पुनर्रचना पाहावयास मिळते. विकसित वाहतूक सुविधांमुळे देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय स्थलांतराचे प्रमाण वाढलेले आहे. स्थलांतरामुळे लोकसंख्येचे विभाजन होते. लोकसंख्येचा वैशिष्ट्यपूर्ण आकृतिबंध निर्माण होतो. हाँगकाँग, सिंगापूर, झांझीबार, हवाई बेटे ही मार्मिक वाहतूक स्थानाची उदाहरणे आहेत.

(i) रशियातील सैबेरियाच्या विस्तृत प्रदेशात वाहतुकीच्या सोईंचा विकास केला जात असल्याने तेथे लोकवस्ती वाढू लागलेली आहे. अनेक नवनवीन औद्योगिक केंद्रे उदयास येऊ लागली आहेत. मुबई पुणे या मार्गावर वाहतुकीच्या सोईंमुळे लोकसंख्या वेगाने केंद्रीत झाली आहे.

(ii) कॅनडाच्या पश्चिम भागातदेखील वाहतूक सुविधांमुळे लोकवस्ती वाढू लागली आहे. किनारी भागात स्वस्त, सुलभ व सुरक्षित असा जलवाहतुकीचा लाभ मिळत असल्याने खंडांतर्गत भागापेक्षा दाट लोकवस्ती आहे.

२. औद्योगिक विकास (Industrial Development) :

औद्योगिकदृष्ट्या विकसित प्रदेशात लोकसंख्येची घनता जास्त असते. व्यवसायाच्या शोधार्थ ग्रामीण भागातील लोक औद्योगिक केंद्राकडे आकृष्ट होतात. पश्चिम युरोपियन देश व संयुक्त संस्थानाचा पूर्व किनारा येथे औद्योगिक प्रगती व व्यापार वृद्धी यामुळे लोकसंख्या रचनेतील प्रचंड बदल आपल्या सहज लक्षात येतात. औद्योगिक क्रांतीच्या फैलावामुळे खनिजांच्या व ऊर्जा साधनांच्या स्थानांना महत्त्व प्राप्त झालेले आहे. खनिजे व ऊर्जा साधनांचे स्रोत, औद्योगिक कच्चा माल व त्यांची उगमस्थाने व उद्योगसमूहांचे

केंद्रीकरण येथे लोकसंख्येचे घनत्व वाढलेले आहे. भारतातील बिहार, पश्चिम बंगाल, महाराष्ट्रातील मुंबई, पुणे औद्योगिक पट्टा, वायव्य युरोप, ईशान्य संयुक्त संस्थाने. युरोपीय रशिया,जपानमधील हॉन्शू बेटाचा आग्नेय भाग औद्योगिकदृष्ट्या प्रगत असल्यानेच अति दाट लोकवस्तीचे आहेत.

३. व्यापार वृद्धी (Growth in Trade): व्यापार वृद्धीचादेखील लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम होतो. मुंबई, लंडन, शांघाय, न्यूयॉर्क या आंतरराष्ट्रीय बंदरांच्या ठिकाणी तसेच नद्यांच्या काठावरील कानपूर, लिऑन (फ्रान्स) व रेल्वेमार्गावरील नागपूर, शिकागो इत्यादी केंद्रे व्यापार वृद्धीमुळे गजबलेली आहेत.

४. नागरिकीकरण (Urbanisation): इ. स. २००१ च्या आकडेवारीनुसार जगातील सुमारे ४८% लोकसंख्या आणि भारतातील २७.८% लोकसंख्या नागरी केंद्रात राहते. मोठ्या शहरात व नगरात व्यापार, वाहतुकीच्या सोई, करमणुकीच्या सोई, आरोग्यविषयक सुविधा, प्रशासकीय कार्य, शिक्षणाच्या सोई असतात. यामुळे अशा केंद्रात लोकसंख्या केंद्रित होते. व्यवसायाच्या शोधार्थ लोक शहराकडे धाव घेतात, जगातील सिंगापूर, बेल्जिअम, ग्रेट ब्रिटन, जर्मनी, स्वीडन, डेन्मार्क, नेदरलैंड, संयुक्त संस्थाने, कॅनडा, माल्टा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, अर्जेटिना, उरुग्वे, इसाईल या देशातील नागरीकरण वाढले आहे. टोकियो, न्यूयॉर्क, लंडन, मास्को पॅरिस, ही जगातील अति दाट लोकसंख्येची नागरी केंद्रे आहेत. भारतात कोलकाता, मुंबई, दिल्ली, मद्रास व हैदराबाद येथे लोकसंख्या घनता जास्त आहे.

५. तांत्रिक प्रगती (Technical Progress): तांत्रिक विकासामुळे आज अनेक देशांत औद्योगिक क्रांती घडून आलेली आहे. औद्योगिक, कृषी, व्यापार व वाहतूक यांच्याशी तंत्रज्ञान विकास निगडित असल्याने लोकसंख्या वितरणावर परिणाम होतो. तांत्रिक प्रगती स्थलांतराचा वेग वाढण्यास मदत झाली. औद्योगिक क्रांतीमुळे तंत्रज्ञानाची क्षितिजे विस्तारली गेली. युरोप, अमेरिका खंडात लोकसंख्या वितरणात मोठ्या प्रमाणात बदल झाले. आंतरराष्ट्रीय स्थलांतरे वाढल्याने आगमन क्षेत्रात लोकसंख्या वाढली तर निर्गमन क्षेत्रात कमी झाली. युरोपियन राष्ट्रात लोकसंख्यावाढीचा प्रश्न चीन, भारतापेक्षा उग्र बनला आहे. तंत्रज्ञान प्रगतीमुळे जगातील नागरीकरणाचा वेग वाढलेला आहे. ग्रामीण-नागरी स्थलांतराचा ओघ वाढल्याने शहरी भागात लोकसंख्या केंद्रित होत आहे. संयुक्त संस्थाने, युरोपियन देश, जपान येथे तांत्रिक विकासामुळे लोकसंख्येची घनता वाढली आहे. भारतात संगणक क्षेत्रातील प्रगतीमुळे मोठया प्रमाणावर आयटी कंपन्याची सुरूवात झाली. यामुळे पुणे, बंगलोर आणि हैदराबाद नागपूर या शहरामध्ये लोकसंख्येची वाढ होवून घनता वाढली.

(क) सामाजिक, ऐतिहासिक व राजकीय घटक (SOCIAL, HISTORICAL AND POLITICAL FACTORS)

१. सामाजिक घटक (Social Factors) : जगातील भिन्न-भिन्न देशांत भिन्न-भिन्न सामाजिक संकेत आहेत. सामाजिक घटकात समाजरचना, समाज वैशिष्टये, शिक्षण, सामाजिक बंधने यांचा समावेश होतो. समाजातील स्त्री व पुरुषांचे स्थानही महत्त्वाचे आहे.

(i) भारतात पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांना दुय्यम स्थान असून पुरुषांचे वर्चस्व आहे.

(ii) भारतात हिंदू धर्मात अजूनही बालविवाह पद्धत आहे.

(ii) मुस्लीम धर्मात बहुपत्नीत्व मान्य आहे.

(iv) युरोपात विवाह उशिरा केले जातात.

(v) अमेरिकेत घटस्फोटाचे प्रमाण जास्त आहे.

सामाजिक संकेताचा परिणाम त्या-त्या देशात लोकसंख्या बदलावर होतो. यामुळे लोकसंख्येची घनता बदलते. भारतात लोकसंख्येच्या वितरणावर जात व धर्म यांचा प्रभाव अधिक आहे. सामाजिक चालीरीती व पंरपरेतील फरकामुळे लोकसंख्या विभागली जाते. कोकणामध्ये आजही लोक वाडी व वस्ती जातीनुसार विभागल्याने लोकसंख्या विरळ आढळते. गंगेच्या खोऱ्यात शेतजमीनीचे वाटप जातीनुसार आहे. यामुळे लोकसंख्या वितरणात तफावत आढळते.

३. ऐतिहासिक घटक (Historical Factors): विशिष्ट काळातील विशिष्ट घटनांचा समावेश ऐतिहासिक घटकात होतो. प्रशासन, साम्राज्य, कायदा संरक्षण, न्यायदान या घटकांचा लोकसंख्या वितरणावर दूरगामी परिणाम होतात. साधनसंपत्तीने समृद्ध असलेल्या प्रदेशात पूर्वीपासून लोकसंख्येचे केंद्रीकरण झालेले आहे. अशा प्रदेशातच प्राचीन मानवी संस्कृती विकसित झाल्या. प्राचीन काळी वसाहत स्थापनेमागे संरक्षण हा घटक महत्त्वाचा होता. जंगली प्राणी, परकीय टोळ्यांची आक्रमणे यांपासून सुरक्षित ठिकाणी वसाहत स्थापन केली जात असे.

भारत हा पूर्वीपासून समृद्ध भौगोलिक प्रदेश असल्याने येथे पश्चिमेकडून टोळ्यांची आक्रमणे झाली. त्यात विविध जाती धर्माचे लोक येथे आले. ब्रिटिश सरकारच्या धोरणामुळे ब्रिटनमध्ये कुटुंबातील मोठ्या मुलास संपूर्ण शेतीचा हक्क दिला. त्यामुळे हजारो आयरीश लोक अमेरिका खंडात स्थलांतरित झाले.

रशियात स्लाव्ह लोकांनी युद्धामुळे व दडपशाही मुळे इतरत्र स्थलांतर केले. दुसऱ्या महायुद्धानंतर इ. स. १९४८ मध्ये ज्यू लोकांसाठी इस्त्राईल हे स्वतंत्र राष्ट्र निर्माण केले तेव्हा जगभरातील ज्यू लोक इस्त्राईलमध्ये आले.

इ. स. १९४७ मध्ये भारत-पाक फाळणी झाल्यावर हजारो सिंधी व निर्वासित भारतात आले. या ऐतिहासिक स्थलांतरामुळे लोकसंख्येची घनता कालप्रवाहात बदललेली

आहे. उत्तर अमेरिकेच्या न्यू इंग्लंड भागात युरोपीय लोकांनी प्रथम वसाहती निर्माण केल्या. यामुळे येथे पूर्वीपासून लोकसंख्येची घनता जास्त आहे. मुंबई, कोलकता, एडन, सुवेझ, रंगून यांसारख्या शहरांवर ऐतिहासिक घटकांचा प्रभाव आहे.

३. राजकीय घटक आणि धोरणे (Political Factors and Policies) : देशातील राजकीय धोरणे देखील लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करतात. रशियन सरकारने राजबंदी कैद्यांना सैबेरियात मुद्दाम पाठविले व तेथे वसाहती प्रथम निर्माण केल्या व नंतर तेथे स्थलांतर प्रक्रिया सुरू झाली. चीनमध्ये 'एक मूल' संकल्पना स्वीकारल्याने लोकसंख्यावाढीला आळा बसला. एकोणिसाव्या शतकात ब्रिटिश राजवटीत भारतातील बरेच लोक दक्षिण आफ्रिका जमैका, मॉरिशस, श्रीलंका, म्यानमार, मलाया या देशांत उद्योगाच्या शोधार्थ स्थलांतरित झाले. यापैकी बरेच लोक तेथे स्थायिक झाले तर काही तेथील राजकीय धोरणांमुळे भारतात परत आले. अशा प्रकारे राजकीय धोरणांचा लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम होत असतो.